# २०२१ च्या निर्देशाची अंमलबजावणी करा

## बदलापूर प्रकरण सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाचे राज्यांना आदेश

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

बदलापूर लैंगिक शोषणप्रकरणाच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना २०२१ च्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश आज दिले.

महाराष्ट्रातील बदलापूर येथील अल्पवयीन मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने बचपन बचाओ आंदोलन प्रकरणात दिलेल्या आदेशाची प्रत सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना देण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयात शाळांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजनाही सुचवल्या आहेत. सर्व राज्यांनी आपल्या आदेशाची मार्गदर्शक तत्त्वे लागू करावीत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

आजच्या सुनावणीत नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्स आणि केंद्र सरकारचे वकील उपस्थित होते. सध्याच्या याचिकेवरील सुनावणीला न्यायालयाने मान्यता देताना याचिकेतील मागणीत सुधारणा करण्यात यावी. कारण यापूर्वी न्यायालयाने केंद्र आणि राज्यांना अंमलबजावणी करणे बंधनकारक असलेल्या अशा विषयावर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती, असे असे सांगितले. न्यायालयाने आपल्या २०२१ च्या आदेशाची प्रत तत्काळ सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठवण्याचे निर्देश दिले. एनसीपीसीआर त्याबाबत देखरेख करेल. एनसीपीसीआर त्याच्या निर्देशांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवेल आणि सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश एनसीपीसीआर ला मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीबाबत स्थिती अहवाल सादर करतील, असेही न्यायालयाने सांगितले.

लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याचे उद्दिष्ट सरकारी, सरकारी अनुदानित आणि खाजगी शाळांमधील शाळा व्यवस्थापनासाठी स्पष्ट उत्तरदायित्व सुनिश्चित करणे आहे, असे बचपन बचाओ आंदोलन प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांत म्हटले आहे. प्रतिबंधात्मक शिक्षण, अहवाल प्रक्रिया, कायदेशीर तरतुदी, समर्थन सेवा आणि सुरक्षित आणि अनुकूल शिक्षण वातावरणाचा प्रचार यावर लक्ष केंद्रित करतात, असेही त्यात नमूद आहे.

पान १ वरून ...

## तपास सीआयडीकडे

आहे. त्याला लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर पाच दिवसांनी अटक करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी सीआयडी पथक मुंब्रा बायपास परिसरात दाखल झालें असून चकमक झालेल्या ठिकाणी तपास केला जात आहे. घटनास्थळाची पाहणीही करीत आहे. सीआयडीचे पथक घटनास्थळाचा पंचनामा करत आहेत. सीआयडी अधिकाऱ्यांकडून अतिशय बारकाईने घटनास्थळी तपास केला जात आहे. पथकाकडून मोबाईलवर छायाचित्रे काढली जात आहेत. घटना नेमकी कुठे घडली? आणि कशा प्रकारे घडली? याचा तपास केला जात आहे. सोमवारी संध्याकाळी अक्षय शिंदेला त्याच्या पत्नीने नोंदवलेल्या दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासासंदर्भात पोलीस वाहनात नेले जात असताना त्याने एका पोलीस अधिकाऱ्याचे रिव्हॉल्व्हर घेतले आणि गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला, परिणामी त्याचा मृत्यू झाला. पोलीस पथकातील अन्य अधिकाऱ्यांनी त्याच्यावर गोळीबार केला. कळवा नागरी रुग्णालयात त्याला नेल्यावर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही घटना पोलीस कोठडीतील मृत्यूशी संबंधित असल्याने त्याचा तपास महाराष्ट्र सीआयडी करणार असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

**पोलिसांच्या दाव्याला आव्हान**

अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी मुलाच्या कथित हत्येचा तपास करण्याची मागणी केली आहे. अक्षयने प्रथम पोलिसावर गोळीबार केला. त्यानंतर पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ प्रत्युत्तर दिले. परिणामी त्याचा मृत्यू झाला, या पोलिसांच्या दाव्याला अक्षयच्या कुटुंबीयांनी आव्हान दिले आहे.

## अमित शहा आज नाशकात

नियोजनाद्वारे मंडळस्तरावर लढवली जाणार आहे. त्यादृष्टीने संपूर्ण तयारी झाली आहे. विभागातील विधानसभा संयोजक, प्रभारी, मंडळ अध्यक्ष, विधानसभा निवडणूक प्रमुख, आजी-माजी लोकप्रतिनिधींच्या कामांचा आढावा घेऊन केंद्रीय गृहमंत्री शहा मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव, क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन उपस्थित राहणार आाहेत. दुपारी १२ वा. शहा यांचे नाशिकला आगमन होईल. दुपारी दीड ते चारदरम्यान ते सातपूर येथील हॉटेल डेमेक्रॉसी येथे बैठकीत मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीत ७५० पदाधिकारी उपस्थित असतील.

## नाशकात पावसाचा मुक्काम

घेत पावसाने जोरदार हजेरी लावली. मध्यरात्रीपासून सकाळपर्यंत ३.७ मि.मी. तर सायंकाळी पाचपर्यंत १०.९ मि. मी पावसाची नोंद झाली. जिल्ह्याचा घाटमाथा व धरण क्षेत्रात होणाऱ्या जोरदार पावसामुळे गोदावरी खोऱ्यातील नद्यांना पुन्हा पूर येण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. पुढील पाच दिवस शक्य तेवढ्या शेतमशागती व खरीप पीक काढणीची कामे उरकावीत, असे आवाहन हवामानतज्ञ माणिकराव खुळे यांनी केले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत शंभर टक्क्यावर पाऊस झाला आहे. धरणसाठा ९६.८७ टक्क्यांवर आहे. दारणा, चणकापूर, हरणबारी, केळझर, गिरणा धरणातून विसग सुरु आहे. नागासाक्या धरण मात्र कोरडेच आहे.


निकाल
महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र तेजस्विनी मासिक सोडत
तिकीट किं. रु. 200/- • सोडत क्रमांक 09 • सोडत दिनांक 24/09/2024

| मालिका | TJ-00 | TJ-01 | TJ-02 | TJ-03 | TJ-04 | TJ-05 | TJ-06 | TJ-07 | TJ-08 | TJ-09 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 25 लाख (रु. 25 लाखाची 2 बक्षिसे) | 0683 | 8399 | - | - | - | - | - | - | - | - |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 10000/- | 0966 | 1499 | 2192 | 4454 | 5267 | 6012 | 7849 | 8395 | 8907 | 9977 |
| | 10000 चे 15 बक्षीसे जिंकले | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 0246 | 1840 | 1978 | 3251 | 4504 | 4496 | 4984 | 5985 | 8077 | 8401 |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 0644 | 0848 | 2006 | 3677 | 4939 | 7897 | 8612 | 8664 | 9426 | 9832 |
| पाचवे बक्षिस रु. 1000/- | 2560 | 5057 | 5111 | 5222 | 5445 | 5924 | 6116 | 6717 | 7927 | 8128 |
| सहावे बक्षिस रु. 500/- | 0192 | 0808 | 1201 | 2357 | 3101 | 4310 | 5925 | 6139 | 6218 | 8583 |

सातवे बक्षीस रु.400/- — सातवे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1183 | 2079 | 2703 | 3535 | 4238 | 4874 | 5533 | 6278 | 6968 | 7738 | 8522 | 9310 |
| | | 1188 | 2126 | 2720 | 3558 | 4250 | 4884 | 5551 | 6283 | 6972 | 7753 | 8588 | 9327 |
| 0000 | 0680 | 1205 | 2142 | 2733 | 3563 | 4268 | 4904 | 5554 | 6289 | 6987 | 7772 | 8682 | 9361 |
| 0006 | 0710 | 1212 | 2197 | 2742 | 3583 | 4269 | 4940 | 5556 | 6317 | 7014 | 7775 | 8689 | 9408 |
| 0007 | 0712 | 1219 | 2215 | 2756 | 3623 | 4291 | 4976 | 5570 | 6327 | 7039 | 7777 | 8760 | 9444 |
| 0009 | 0720 | 1230 | 2223 | 2795 | 3625 | 4295 | 5001 | 5584 | 6353 | 7062 | 7779 | 8784 | 9459 |
| 0037 | 0736 | 1241 | 2232 | 2813 | 3638 | 4296 | 5054 | 5621 | 6363 | 7063 | 7782 | 8813 | 9481 |
| 0043 | 0750 | 1256 | 2233 | 2886 | 3647 | 4324 | 5095 | 5641 | 6368 | 7071 | 7794 | 8822 | 9499 |
| 0044 | 0755 | 1285 | 2238 | 2892 | 3674 | 4377 | 5140 | 5653 | 6378 | 7093 | 7797 | 8855 | 9501 |
| 0060 | 0793 | 1314 | 2242 | 2904 | 3684 | 4402 | 5173 | 5692 | 6417 | 7124 | 7825 | 8868 | 9549 |
| 0078 | 0801 | 1359 | 2256 | 2912 | 3707 | 4410 | 5251 | 5735 | 6451 | 7157 | 7877 | 8871 | 9554 |
| 0082 | 0836 | 1460 | 2272 | 2942 | 3730 | 4411 | 5252 | 5755 | 6460 | 7163 | 7878 | 8875 | 9570 |
| 0090 | 0850 | 1472 | 2275 | 3001 | 3743 | 4419 | 5258 | 5771 | 6478 | 7179 | 7957 | 8876 | 9599 |
| 0105 | 0905 | 1488 | 2305 | 3003 | 3778 | 4423 | 5270 | 5780 | 6485 | 7183 | 7967 | 8881 | 9602 |
| 0117 | 0914 | 1561 | 2322 | 3138 | 3785 | 4440 | 5278 | 5784 | 6529 | 7209 | 7973 | 8883 | 9645 |
| 0138 | 0940 | 1631 | 2328 | 3153 | 3799 | 4443 | 5313 | 5788 | 6561 | 7299 | 7997 | 8903 | 9672 |
| 0204 | 0958 | 1660 | 2329 | 3166 | 3800 | 4452 | 5327 | 5808 | 6566 | 7313 | 8054 | 8909 | 9691 |
| 0227 | 0985 | 1671 | 2338 | 3183 | 3815 | 4473 | 5355 | 5812 | 6567 | 7341 | 8092 | 8927 | 9694 |
| 0292 | 1012 | 1680 | 2403 | 3214 | 3822 | 4491 | 5359 | 5828 | 6602 | 7366 | 8153 | 8938 | 9696 |
| 0305 | 1019 | 1713 | 2407 | 3232 | 3839 | 4493 | 5372 | 5857 | 6646 | 7371 | 8167 | 8952 | 9709 |
| 0307 | 1098 | 1718 | 2442 | 3253 | 3874 | 4530 | 5375 | 5902 | 6661 | 7377 | 8184 | 8974 | 9714 |
| 0322 | 1108 | 1725 | 2458 | 3313 | 3908 | 4534 | 5385 | 5912 | 6665 | 7383 | 8186 | 8986 | 9721 |
| 0324 | 1110 | 1765 | 2463 | 3320 | 3923 | 4540 | 5391 | 5960 | 6673 | 7434 | 8200 | 8987 | 9737 |
| 0349 | 1120 | 1766 | 2471 | 3333 | 3925 | 4541 | 5420 | 5979 | 6680 | 7453 | 8208 | 9009 | 9790 |
| 0389 | 1122 | 1785 | 2476 | 3335 | 3934 | 4600 | 5426 | 6025 | 6681 | 7470 | 8267 | 9029 | 9798 |
| 0403 | 1135 | 1854 | 2479 | 3339 | 3969 | 4650 | 5433 | 6056 | 6686 | 7572 | 8282 | 9044 | 9811 |
| 0406 | 1136 | 1869 | 2502 | 3348 | 4007 | 4684 | 5452 | 6062 | 6688 | 7583 | 8286 | 9059 | 9869 |
| 0407 | 1141 | 1882 | 2522 | 3354 | 4024 | 4689 | 5453 | 6083 | 6706 | 7586 | 8288 | 9079 | 9899 |
| 0410 | 1143 | 1892 | 2546 | 3360 | 4032 | 4705 | 5474 | 6094 | 6727 | 7597 | 8338 | 9080 | 9908 |
| 0412 | 1154 | 1896 | 2592 | 3372 | 4068 | 4740 | 5498 | 6124 | 6753 | 7598 | 8387 | 9097 | 9913 |
| 0420 | 1157 | 1911 | 2596 | 3380 | 4082 | 4755 | 5503 | 6138 | 6756 | 7608 | 8450 | 9149 | 9932 |
| 0498 | 1162 | 1921 | 2602 | 3393 | 4107 | 4760 | 5505 | 6141 | 6766 | 7664 | 8478 | 9168 | 9938 |
| 0510 | 1170 | 1927 | 2629 | 3398 | 4134 | 4783 | 5507 | 6145 | 6884 | 7698 | 8494 | 9205 | 9967 |
| 0525 | 1171 | 1955 | 2641 | 3421 | 4144 | 4834 | 5517 | 6198 | 6901 | 7721 | 8508 | 9213 | 9973 |
| 0550 | 1174 | 1961 | 2654 | 3493 | 4220 | 4858 | 5524 | 6213 | 6936 | 7735 | 8510 | 9291 | 9982 |
| 0572 | 1175 | 2012 | 2673 | 3511 | 4237 | 4862 | 5532 | 6246 | 6946 | 7737 | 8518 | 9299 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


## चार दिवस मुसळधार!

या जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, परभणी, बीड, हिंगोली, नांदेडकरता 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे. मोसमी पावसाने पश्चिम राजस्थान व गुजरातमधील कच्छ येथून परतीचा प्रवास सुरु केला आहे. त्यामुळे बंगालचा उपसागर आणि म्यानमारच्या दक्षिण किनारपट्टीवर हवेची चक्रिय स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी आजपासून बंगालच्या उपसागरात हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन ते महाराष्ट्राच्या दिशेने सरकण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरातील हवामानविषयक स्थितीचा परिणाम म्हणून पूर्व किनारपट्टीवर जोरदार पाऊस पडत आहे. पुढील चार दिवस वादळी वारे, मेघगर्जनेसह विदर्भ, मराठवाडा आणि कोकण किनारपट्टीवर मुसळधारेचा अंदाज आहे.

## तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना मंजुरी

आहे. यानुसार तीर्थस्थळ आणि पर्यटनस्थळांच्या विकासासाठी तातडीने नियोजन करण्यात यावे. तसेच सर्वच ठिकाणची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण व्हावीत याची काळजी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार अमळनेर (जि. जळगांव)येथील देशातील एकमेवाद्वितीय अशा मंगळग्रह देवस्थानाच्या २५ कोटींच्या विकास आराखड्यास तसेच सातारा जिल्ह्यातील कोयना जलाशय-मौजे मुनावळे (ता.जावळी) येथील जलक्रीडा पर्यटन सुविधेसाठी ४७ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीस मान्यता देण्यात आली. हे सर्व प्रस्ताव पर्यटन विभागाने सादर केले. ग्रामविकास विभागाने सादर केलेल्या अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन येथील १८ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. तसेच बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र गहिनीनाथगडाच्या विकास आराखड्यातील २ कोटी ६७ लाखांच्या कामांस मान्यता देण्यात आली. याशिवाय मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात अजमल कसाब या सशस्त्र दहशतवाद्यास जिवंत पकडणाऱ्या शहीद तुकाराम ओंबळे यांच्या सातारा जिल्ह्यातील केंडबे (ता.जावळी) येथील मूळगावी स्मारक उभारण्यासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीस बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय नगरविकास विभागाने नागपूर शहरातील आराखडे सादर केले. त्यातील लक्ष्मीनारायण शिवमंदिर-नंदनवनच्या २४ कोटी ७३ लाखांच्या विकास आराखड्यास, कुत्तेवालेबाबा मंदिर आश्रम-शांतीनगरसाठी १३ कोटी ३५ लाख रुपये आणि मुरलीधर मंदिर पारडी विकास आराखड्यासाठी १४ कोटी ३९ लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.

## ट्रस्टींचा मानवी तस्करीत सहभाग?

लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे. तर आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काऊंटरनंतर त्याच्या वडिलांच्या वतीने ॲड. कटारनवरे यांनी पोलीस संरक्षण देण्याची मागणी न्यायालयाकडे केली. याची दखल खंडपीठाने घेत आधी याचिका दाखल करा, असा सल्ला देत सुनावणी उद्या घेण्याची हमी दिली. बदलापूरमध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा गुन्हा नोंद झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्या शाळेतून अन्य एक मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. ट्रस्टी आणि शाळेतून सीसीटीव्ही गायब करणारा कर्मचारीही अद्याप फरार असल्याने ठाणे पोलीस आणि एसआयटीच्या कारभारावर सवाल प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणात बड्या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याने संपूर्ण तपास तातडीने सीबीआयकडे वर्ग करा,अशी विनंती याचिकेत केली आहे.

## समर्थ बँकेची वार्षिक सभा




**नाशिक |** श्री समर्थ सहकारी बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच नाशिकमध्ये श्रीपाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बँकेच्या एनपीए कर्ज खात्यात लक्षणीय वसूली झाली असून, मार्च २०२४ अखेर निव्वळ एनपीए ५.१६ % आहे. तसेच ३१ ऑगस्ट २०२४ अखेर निव्वळ एनपीए ०.८६ % इतका कमी झाला आहे. थकीत कर्जदारांच्या मालमत्ता ताब्यात घेऊन त्याची लिलावाने विक्री करण्याची कार्यवाही सुरू आहे. कर्जवाढीसाठी उत्सव कर्ज योजना सुरू आहे. त्यात कर्ज प्रक्रिया शुल्क माफ, जामीनदार नाही त्वरित कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. बँकेची आर्थिक स्थिती अधिक चांगली होण्याकरिता व बँक एफएसडब्ल्यूएम मध्ये आणण्याकरिता संचालक मंडळाचे प्रयत्न सुरू असल्याचे श्रीपाद कुलकर्णी यांनी नमूद केले. मकरंद सुखात्मे, डॉ. श्रीप्रशांत पुरंदरे, अलका कुलकर्णी, मंगेश मालपाठक, दशपुत्रे, अरुण भांड, विजय भावे, दिलीप साळवेकर, संजय गिते, प्राय, अमित माळी, दत्ता गांगुर्डे, संदीप गांगुर्डे, दिगंबर कुलकर्णी, प्रमोद पुराणिक, मयूर कपाटे, शंतनू देशपांडे, राजेश उपासनी, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, संतोष कमोद, प्रदीप जाधव, हेमंत धात्रक, सुहास भणगे, बळीराम चांडोले, उत्तम दोंदे,प्रदीप जाधव, काजळे अनंत, सुदर्शन डोंगरे, ॲड.भास्कर पवार आदींनी सभा कामकाजात भाग घेतला. सभेस उपाध्यक्ष राजेश गांगुर्डे, ॲड. जालिंदर ताडगे, नरेंद्र कुलकर्णी, डॉ. रविकिरण निकम, राधाकृष्ण नाईकवाडे, मनोज गोडसे, शिरीष मोराणकर, राजेंद्र खेडलेकर, मनोज बाग, मंदार ओलतीकर, मंदार तगारे, योगिता खांडेकर, किशोरी एकबोटे, रूपाली जुन्नरे, अभिजीत जोशी, दीपक ठाकुर आदी उपस्थित होते.

## 'सह्याद्री हॉस्पिटल'मध्ये अत्याधुनिक रोबोटिक प्रणालींचे अनावरण



**नाशिक |** सह्याद्री हॉस्पिटलने नाशिकमध्ये अत्याधुनिक रोबोटिक सेंटर सुरू केले आहे. या अत्याधुनिक प्रणालींमुळे शस्त्रक्रियेतील अचूकता वाढून रुग्णसेवा अधिक सुधारणार आहे. वेलिस ऑर्थो रोबोटच्या सहाय्याने नुकत्याच १६० हून अधिक गुडघ्याच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाल्या आहेत, आणि दा व्हिंची एक्स रोबोटिक प्रणालीच्या सहाय्याने देखील अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या प्रणालींच्या सहाय्याने सह्याद्री हॉस्पिटलने वैद्यकीय क्षेत्रात नवीन उंची गाठली आहे. दा व्हिंची एक्स रोबोटिक प्रणालीचे पारंपारिक शस्त्रक्रियांच्या तुलनेत अनेक फायदे असल्याचे डॉ. रोबोटिक लॅप्रोस्कोपिक जनरल सर्जन जी. बी. सिंग यांनी सांगितले. सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये गेल्या १० वर्षांपासून रोबोटिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी विभागाचे नेतृत्व करणारे डॉ. प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेली ही उत्तर महाराष्ट्रातील पहिली सॉ नेव्हिगेटेड तंत्रज्ञानाची प्रणाली आहे. वेलिस रोबोट शस्त्रक्रियेदरम्यान अधिक अचूकता प्रदान करतो, शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या वेदना कमी करतो आणि रोगमुक्ततेचा वेळ देखील कमी करतो. यामुळे शस्त्रक्रियेनंतर रुग्ण लवकर चालू शकतात आणि दैनंदिन क्रिया करण्यास सक्षम बनतात. सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नाशिकचे सहाय्यक उपाध्यक्ष संजय चावला म्हणाले, वेलिस ऑर्थो आणि दा व्हिंची रोबोट्सच्या क्षमतांमुळे आम्ही आमच्या रुग्णांना सुरक्षित, अधिक प्रभावी उपचार पर्याय देऊ शकतो. याशिवाय, रुग्णांना प्रगत शस्त्रक्रियांसाठी आता मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज नाही, कारण आम्ही नाशिकमध्येच ही अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देत आहोत

## द एसयूव्ही थार रॉक्सचे अनावरण



नाशिक | नाशिक महिंद्रा अँड महिंद्रा बहूप्रतिक्षीत द एसयूव्ही थार रॉक्सचे अनावरण निवेक क्लब येथे करण्यात आले. नाशिक मधील महिंद्राचे अधिकृत विक्रेते मे. जितेंद्र मोटर्स व भाविन व्हील्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पोलीस निरीक्षक मधुकर कड यांची प्रमुख उपस्थिती होती. थार रॉक्सचे बुकिंग घटस्थापनेला सुरु होणार आहे. ५ डोर, सनरूफ व उच्च श्रेणीच्या सुरक्षा प्रणाली, आकर्षक रंग अशी कारची वैशिष्ट्य आहेत. शोरूममध्ये टेस्ट ड्राईव्हसाठी कार उपलब्ध आहे. चार चाकी घेण्यास इच्छुक ग्राहकांनी या कारची टेस्ट ड्राईव्ह अवश्य घ्यावी असे आवाहन जितेंद्र शाह व अमिष शाह यांनी केले आहे.


## एमजी विंडसरचे नाशिकमध्ये अनावरण



**नाशिक |** येथील अंबडच्या जितेंद्र व्हील्स (एन) प्रा. ली. ने नाशिकमध्ये एमजी विंडसर हे भारतातील पहिले इंटेलिजेंट कॉम्पॅक्ट युटिलिटी ही चारचाकीचे अधिकृत अनावरण केले.

याप्रसंगी अशोका बिल्डकॉन लि.चे अध्यक्ष अशोक कटारिया, व्यवस्थापकीय संचालक सतीश पारख यांसह प्रितेश शहा, शरद शहा, जितेंद्र शहा, प्रतीक शहा, समकित शहा, डॉ. प्रमोद शहा, संदिप शहा, अतुल शहा, संजय शहा, विराज शहा, प्रशम शहा आदी मान्यवर उपस्थित होते. एमजी विंडसर भारतीय ग्राहकांसाठी उत्तम वैशिष्ट्यांसह सुसज्ज आहे. एका चार्जवर ३३२ किमी ही कार चालत असल्याचे यावेळीसांगण्यातआले.

## शब्दकोडे : ५४



**आडवे शब्द** - १) न बोललेले, न सांगितलेले. ४) थडगे, कबर. ७) सुरक्षित. ९) कलाबूत, सोन्याचा धागा. १०) कंटाळवाणे, लांबलचक भाषण. ११) हत्तींचा राजा. १४) अर्थहीन बडबड. १६) जास्तीत जास्त. १७) जगणे. १८) चिंतन. २०) पद्धत, प्रथा. २१) उदर. २२) स्वयंपाकी. २३) सख्खा भाऊ. २४) शेवट, अंत. २५) पावसाची झड. २६) खरा (हिं.). २७) नशा आणणारा एक पदार्थ. २८) शासन संस्था चालविणारे मंत्री मंडळ. ३०) रोग, आजार. ३१) शिकणे. ३३) उघडपणे, बेधडक. ३४) मित्र. ३६) मृत. ३७) जरीचापदर असलेली. ३९) सशास्त्र, रुढीप्रमाणे. ४१) व्यापारी फायदा. ४३) आठवण (हिं.) ४५) सैन्याचा मुक्काम, बूड. ४६) सत्व. ४८) विश्व, दुनिया. ५०) मीठ. ५१) त्याप्रमाणे. ५३) रविवासर. ५४) आपला परका असा भेद. ५७) दृष्टी. ५९) मर्कट. ६१) समुद्रकिनारा. ६३) नमस्कार. ६५) सहाय्य. ६६) पुन्हा. ६८) मेंढा. ६९) चिवचिवाट. ७२) कोपरा, बाळंते, आईस्क्रीमचा निमूळता कप. ७३) मळलेला. ७४) पळसाचा डिंक.

**उभे शब्द** - १) अद्भूत, विचित्र. २) नवा कोरा. ३) कोल्ह्यासारखा एक जंगली प्राणी. ४) मळलेला. ५) सर्वस्वी दुसऱ्याच्या तंत्राने चालणारा, दुसऱ्याचा हस्तक. ६) गवंडी. ७) नटणे. ८) अत्यंत विद्वान व्यक्तीस दिली जाणारी पदवी. १२) भारताचे दिगवंत तरूण पंतप्रधान. १३) माकड. १५) वायु, हवा. १९) मोठी नदी. २१) अनाथ. २४) परग्रहावर जाणारे वाहन. २५) पातळसर. २८) कमळ. २९) सैन्याचा माल पुरवठा. ३०) व्यापार करणारा. ३१) शहीद सैनिकांचे स्मारक. ३२) पडणे, ऱ्हास. ३५) वाळलेली खजुराची बी. ३८) धावत-धावत. ४०) बिनावासाचे पांढरे फूल. ४२) बरगडी. ४४) थकावट. ४७) शेअर बाजारातील शेअरचा एक प्रकार. ४९) गरजू. ५२) नाग, सर्प. ५५) सप्तपाताळातील शेवटचे. ५६) नवरदेवाला घालण्याचा हार. ५८) दात. ५९) मातृभाषा. ६०) कोलकाताचे विमानतळ. ६२) गाडीचे छत. ६४) नूतन. ६७) खोडण्याचे साधन. ६९) एखाद्या विरूद्ध रचलेले कारस्थान. ७०) खण. ७१) एकाग्र नजर. ७२) दोन मैल.

## शब्दकोडे५३चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जु | गा | र | | प | त | न | | म | | ना | सि | का | | भ |
| ड | | | ह | र | ह | र | म | हा | दे | व | | सा | स | र |
| गा | ठो | डे | | त | ह | | धु | न | | र | ख | र | खी | त |
| | क | रा | ल | | या | च | क | | वा | स | र | | | वा |
| ग | र | | प | श्वा | त | | र | क्ष | क | | व | | ऐ | क्य |
| जा | णे | ये | णे | | | बी | | मा | स | | स | द | रा | |
| न | | न | | | प | ड | छा | या | | गो | | शा | व | क |
| न | द | | न | ग | र | | पा | च | क | | स | | त | र |
| म | हा | सा | ग | र | | दा | | क | स | | ह | वा | | मु |
| हा | | ल | | म | जे | दा | र | | र | | दे | व | भ | क्त |
| रा | ज | वा | डा | | म | | ख | | त | ला | व | | यं | |
| ज | | री | स | | ते | ल | वा | त | | ज | | चा | क | र |
| | सा | | | स | म | | ल | वा | द | | स | म | र | स |
| अ | प | रं | पा | र | | | दा | | | पा | ल | खी | | वा |
| ट | | ग | | स | मा | चा | र | प | त्र | | ग | ळ | | न |